# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्र. १२/२०१८**

४.प्रा. सूर्यकांत अनुरथ गिरी } तक्रार अर्जदार

विरूध्द

१.श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे, खुर्द
५.वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, जि. सांगली } वि. प.

तक्रारीचे स्वरूप:

तक्रार अर्जामध्ये दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार यांची नेमणूक दि. ०१/०९/२०१० रोजी झाली आहे. श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे, खुर्द या संस्थेचे वारणा महाविद्यालय, ऐतवडे, खुर्द, जि. सांगली येथे तक्रारदार समाजशास्त्र या विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक पदावर वारणा महाविद्यालयात कार्यरत आहेत. तक्रारदार यांनी दि. १७/०६/२०१४ रोजी विविध मागण्या करणारे नम्र निवेदन दिले म्हणून मा. प्र—प्राचार्यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता तक्रारदार यांची जुलै २०१४ ची वार्षिक वेतन वाढ रोखली आहे. या संदर्भातील विचारणा करणारा पत्रव्यवहार दि. १३/०८/२०१४ रोजी करून व या संदर्भातील स्मरणपत्र दि. १७/१०/२०१४ रोजी देवून ही तक्रारदार यांना प्र—प्राचार्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. तरी रोखलेली वेतनवाढ देण्याविषयी संबंधितांना आदेश व्हावेत ही विनंती तक्रारदार यांनी केली आहे.

उपरोक्त तक्रारीसंदर्भात संस्थेतर्फे तक्रारअर्जामध्ये खालीलप्रमाणे निवेदन दिले आहे.

१.सेवाप्रारंभापासून आजतागायत सेल्फ ॲपरायजल व ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नाहीत.

२.सातत्याने पत्रव्यवहार करून महाविद्यालय व संस्थेची बदनामी करणे.

३.महाविद्यालय कामामध्ये टाळाटाळ करणे.

४.वेतनवाढ रोखणेसंदर्भात संस्थेने दिलेले आदेश.

महाविद्यालयातर्फे प्राचार्य यांचे तक्रारअर्जामधील निवेदन खालीलप्रमाणे मांडले आहे.

१. तक्रारदार प्रा. श्री. एस. ए. गिरी यांनी महाविद्यालय सेवेत आल्यापासून आज अखेर सेल्फ ॲपरायजल/ ए.पी.आय. फॉर्म भरून दिलेले नाहीत.
२. प्राचार्यांनी नेमूण दिलेल्या कामामध्ये टाळाटाळ करणे.
३. वरिष्ठांवर खोटे आरोप करणे.

वरील कारणांमुळे प्रा. श्री. एस. ए. गिरी यांची माहे जुलै २०१४ पासून देण्यात येणारी वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे.

संस्थेतर्फे डॉ. प्रताप पाटील समितीसमोर उपस्थित. समितीने दोन्ही पक्षाकडील कागदपत्रे विचारात घेतली. महाविद्यालयाने दि. ०१/०७/२०१४ रोजीच्या पत्राने तक्रारदार यांना जुलै, २०१४ पासून देण्यात येणारी वार्षिक वेतनवाढ संस्था आदेशाने रोखण्यात येत असल्याचे कळविले आहे.

तथापि उपरोक्त पत्रामध्ये वेतनवाढ कायमस्वरूपी आहे किंवा कशी याबाबत उल्लेख केलेला दिसून येत नाही. तसेच वेतनवाढ रोखण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्वाचा अवलंब केलेचे दिसून येत नाही अथवा परिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

सदरचे प्रकरण चालू असताना तक्रारदार यांनी दि. २७/०८/२०१८ रोजी वेतनवाढीच्या संदर्भात कायदेशीर बाबी बघून निर्णय घेण्याचे ठरले असलेने तक्रार अर्ज निकाली काढणेत यावा असे पत्र दिले. तथापि दि. २५/०९/२०१८ रोजी वेतनवाढ संदर्भात संस्था व महाविद्यालयाकडून कोणतीही कार्यवाही न झालेने वेतनवाढबाबत तक्रार अर्ज पुढे चालविणेस लेखी विनंती केली.

सबब समितीस असे निर्दशनास आले की, संस्थेने वेतनवाढ रोखण्याबाबतची कायदेशीर बाबी पाहून निर्णय घेतलेला नाही, परिनियमातील कार्यपद्धतींचा अवलंब करून तक्रारदार दोषी आढळल्यामुळे त्याची वेतनवाढ थांबली असल्याबाबत समाधानकारक म्हणणे समितीसमोर आले नाही. त्यामुळे संस्थेची वेतनवाढ रोखण्याबाबतची कार्यवाही न्यायाच्या अनुषंगाने मान्य करता येणार नाही.

## आदेश

तक्रारदार यांचा तक्रारअर्ज मंजूर करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांची जुलै २०१४ पासून रोखलेली वार्षिक वेतनवाढ त्वरीत चालू करण्यात यावी. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना देवून तसे कळविण्यात यावे.

दि. २१/०५/२०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष
(श्री. ना. गुं. पाटील)

सदस्य
(श्री. अ. अ. कुलकर्णी)

सदस्य
(श्री. प्र. द. राऊत)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य सचिव
(श्रीमती. अ. अ. कदम)